Page :
Date : २६/०८/२०२१

सु. क्र. ७/२१

## सूचना

"महाविद्यालय विकास समिती" च्या सर्व सदस्यांना सूचित करण्यात येते की, सत्र २०२१-२०२२ च्या महाविद्यालया अंतर्गत 'महाविद्यालय विकास समितीची प्रथम सभा दिनांक ०४/०९/२०२१ ला संस्थेचे अध्यक्ष मा. दिपा मिलिंद बलखंडे यांच्या उपस्थितीत दुपारी १२.०० वाजता खालील विषयांवर प्राचार्य कक्षामध्ये चर्चा सत्र आयोजित करण्यात आलेली आहे करीता सर्व सदस्यांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

सभेपुढील चर्चेचे विषय :-

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे
२) सत्र २०२०-२१ चे अंकेक्षण (Audit) मंजूर करणे
३) सत्र २०२१-२२ करीता अर्थसंकल्प (Budget) मंजूर करणे
४) अल्पकालावधी अभ्यासक्रमांना (Short Term Course) मान्यता देणे
५) मा. शिला कापसे (तात्कालीन प्राचार्य सत्र १९९८-९९) यांची नोंदी अंकेक्षणातून रद्द करविणे
६) Online or offline Journals च्या खरेदी विषयी चर्चा करणे
७) अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय

महा. विकास समिती सदस्यांची नांवे व सह्या

१) डॉ. दिपा एम. बलखंडे — [signature]
२) श्री. मा. मिलींद एल. बलखंडे — [signature]
३) श्री. एम. जी. वाहाणे — [signature]

[signature]
Officiating Principal
Dr. L.D. Balkhande
College of Arts and Comm
Pauni. Dist Bhandara

PTO

४) डॉ. स्वाती एस. शेंमरण्णर – S.S.S.

५) श्री. एन. पी. सिंगाडे –

६) श्री. एन. जी. जाधव

७) श्री. आर. जी. राऊत

८) श्री. ॲडो. देव एन. गोवर्धन

९) डॉ. विक्रम के. राखडे

१०) डॉ. एस. एम. बांस्तू

११) श्री. शील्पेन्त एस. भोगे

Page :
Date : / /

महाविद्यालय विकास समितीच्या २०२१-२०२२सत्रातील प्रथम सभेचे इतिवृत्त (दि. ०४/०९/२०२१)

सूचना क्र. सी डी सी/७ दि. २६/०८/२०२१ नूसार आज दि. ०४/०९/२०२१ ला दु. १२.०० वाजता सी डी सी समितीची २०२१-२०२२ सत्रातील प्रथम सभा संस्था अध्यक्षा मा. दिपा एम. बलखंडे मॅडम यांच्या अध्यक्षते-खाली तसेच संस्था सचिव आद. मिलींद एल. बलखंडे सर ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राचार्य कक्षात घेण्यात आली.

सभेला उपस्थित पदाधिकारी (नावे व सह्या)

१) श्री. एम. एल. बलखंडे — Milind Balkhande
२) प्राचार्य, एस. एम. नंदागवळी — [signature]
३) उप प्राचार्य श्री. एन. पी. सिंगाडे — [signature]
४) श्री. एम. जी. वाहाणे — [signature]
५) कु. एस. एम. शंभरकर
६) श्री. एन. जी. जाधव — [signature]
७) श्री. आर. जी. राऊत — [signature]
८) श्री. ॲडो. डी. एन. गोवर्धन
९) श्री. एम. एम. बांन्सू — [signature]

MBalkhande

सभाध्यक्ष
महाविद्यालय विकास समिती

पेज नं. ४४ पुढे

महाविद्यालय विकास समिती सभा दि ०४/०५/२०२१

## सभेचे इतिवृत्त

दि. ०४/०५/२०२१ ला दुपारी १२ वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा, प्रवरसेन शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा मा. दीपा मिलिंद बलखंडे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रवरसेन शिक्षण संस्थेचे सचिव मा. मिलिंद ल. बलखंडे तसेच महाविद्यालय विकास समितीचे सचिव प्रा. संजय नंदागवळी यांच्या उपस्थितीत पार पडली. त्या सभेत खालील विषयांवर सविस्तर चर्चा होवून सभेच्या सूचनेवरील विषयांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र. १ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

यापूर्वीची महाविद्यालय विकास समितीची सभा दि. १३/०३/२०२१ ला घेण्यात आली होती त्या सभेचे इतिवृत्त कार्यकारी प्राचार्य प्रा. संजय नंदागवळी यांनी वाचून दाखविले व त्या सभेमध्ये ठरविलेल्या विषयांवर चर्चा घडून आली मागील सभेमध्ये पारीत झालेल्या विषयांची पूर्तता करण्याचे आश्वासन दिले. मागील सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

Page :
Date : / /

विषय क्र.२ सत्र २०२०-२०२१ चे अंकेक्षण मंजूर
सत्र २०२०-२०२१ चे अंकेक्षण, श्री महान ॲन्ड कंपनी नागपूर यांचे कडून मान्य करून आणण्यात आले. ते अंकेक्षण कार्यकारी प्राचार्य प्रा संजय नंदागवळी यांनी सर्वांसमोर वाचून दाखविले. गरिमा प्रकाशन चे रु. १६३७९ वर्ष २०२१-२२ मध्ये देण्यात यावेत असे ठरले. व सत्र २०२०-२१ चे अंकेक्षण सर्वानुमते मान्य करण्यात आले.

विषय क्र.३ वर्ष २०२१-२२ करीता अर्थसंकल्प मंजूर करणे.
सत्र २०२१-२२ करीता खर्च व आवक संबंधी अर्थसंकल्प तयार करण्यात आला व मुख्य लिपिक श्री राऊत यांनी महाविद्यालय विकास समिती समोर सादर केला. काही किरकोळ सुधारणा सूचवून सत्र २०२१-२२ करिताचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.

ठराव क्र.४ अल्पकालावधी अभ्यासक्रमांना मान्यता देणे.
सत्र २०२०-२१ मध्ये महाविद्यालयातर्फे जे अल्पकालावधी अभ्यासक्रम घेण्यात आले. त्यांची माहिती कार्यकारी प्राचार्य डॉ संजय नंदागवळी

Page :
Date : / /

यांनी सभेस दिली. मात्र कोरोना कालावधीमुळे रा.तु.म. विद्यापिठाने सत्र २०२०-२१ च्या अल्पकालावधी अभ्यासक्रमांना मंजूरी दिलेली नाही. सत्र २०२१-२२ करीता पांच विषयांचे अल्पकालावधी अभ्यासक्रम तयार करण्यात आले. व रा.तु.म. नागपूर विद्यापिठाकडे मान्यतेकरी-ता पाठविण्यात येत आहेत. त्यामुळे कार्यकारी प्राचार्यांच्या विनंती नूसार सत्र २०२१-२२ करीता नवीन अल्पकालावधी अभ्यासक्रमांना सर्वानूमते मंजूरी देण्यात येवून ठराव संमत करण्यात आला.

ठराव क्र.५ प्रा. शिला सोमनाथ कापसे (तत्कालीन प्राचार्य १९९८-९९) यांची देणी अंकेक्षणातून रद्द ठरविने.

वरील प्रकरण खूप पूर्वीचे आहे. प्रा. शिला कापसे यांची जी काही देणी आहेत. ते कशासंबं-धी आहेत त्यांचा रेकॉर्ड उपलब्ध नाही. त्या सेवानिवृत्त झाल्यात व मरण पावल्यात मात्र त्यांचे नावासमोर अनेक वर्षापासून ऑडीट मध्ये देणी शिल्लक असल्याचे दर्शवि-ण्यात येत आहे. वरील बाबीवर सविस्तर चर्चा होवून त्यांची देणी अंकेक्षणातून रद्द करण्याचे सर्वानूमते ठरले.

Page :
Date : / /

ठराव क्र.६ Online व offline Journals खरेदी विषयी

प्रवरसेन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपा मिलींद बलखंडे यांच्या सूचनेनुसार काही online मोफत Journals आहेत ते download करून घ्यावेत व offline Journals (मासिक) स्पर्धा परीक्षा संबंधी असतील, ललीत साहित्य असेल व विद्यार्थ्यांच्या उपयोगाचे असतील असे कमीतकमी ५ साप्ताहिक / मासिक नियमीत खरेदी करावेत असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

ठराव क्र.७ अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय

अ) कार्यकारी प्राचार्य प्रा. संजय नंदागवळी यांनी यांनी डॉ. जगदीश कोहीराम जांगडे (इंग्रजी विभाग) यांच्या अतिरिक्त झालेल्या वैदयकिय रजेचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी असे सांगीतले की दि. १३/०३/२०२१ च्या महाविद्यालय विकास समितीच्या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे इंग्रजी विषयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. जगदीश जांगडे यांच्या अतिरिक्त १६ सूट्यांचे (वैदयकिय) वेतन कपात करण्यासंबंधीत निर्देश मा. सहसंचालक उच्च शिक्षण अनुदाने नागपूर विभाग नागपूर यांचे कडून मागविण्यात आले होते, परंतू तत्सम निर्देश अद्यापर्यंत प्राप्त

Page :
Date : / /

झालेले नाहीत. डॉ. जोगदे यांच्या पुर्वीस सेवा कालावधीचा विचार करता, त्यांच्या अतिरिक्त वैद्यकिय रजा पूढील कालावधीमध्ये समायोजित करण्यात याव्यात. यानंतर डॉ. जोगदे यांच्या अतिरिक्त वैद्यकिय रजांसंबंधीचा कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. असे सर्वानुमते ठरले व ठराव संमत झाला.

ब) डॉ. शंभरकर यांनी ग्रंथालयास टाईल्स लावून अद्ययावत करण्याची सूचना केली. परंतू संस्था सचिव मा. मिलींद बलखंडे यांनी, निधी अभावी ग्रंथालय अद्ययावत करता येणार नाही, पूढील कालावधीमध्ये निधी प्राप्त झाल्यास पूढील कालावधीमध्ये ग्रंथालय अद्ययावत करू असे सांगितले.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने महाविद्यालय विकास समितीचे सचिव, कार्यकारी प्राचार्य यांनी सर्वांचे आभार मानून सभा समाप्तीची घोषणा केली.

Officiating Principal
Dr. L. D. Balkhande
College of Arts and Comm...
Pauni, Dist. ...

Page :
Date : २९/०४/२०२२

सु.क्र. ८/२१

## सूचना

"महाविद्यालय विकास समिती" च्या सर्व सदस्यांना सूचित करण्यात येते की सत्र २०२१-२०२२ च्या महाविद्यालया अंतर्गत 'महाविद्यालय विकास समितीची' द्वितीय सभा दिनांक ०२/०५/२०२२ रोज सोमवारला 'संस्थेचे अध्यक्ष मा. दिपा मिलींद बलखंडे आणि संस्था सचीव आद. मिलींद बलखंडे तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य यांच्या उपस्थीतीमध्ये सकाळी ठिक ११.०० वाजता खालील विषयांवर प्राचार्य कक्षामध्ये चर्चा सभा आयोजीत करण्यात आलेले आहे. करीता सर्व सदस्यांची उपस्थीती प्राधान्येय आहे.

समेपुढील चर्चेचे विषय :-

१) मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे
२) श्री. संजय दुमाणे (शिपाई) यांच्या कालबद्ध पदोन्नतीचा प्रस्ताव पाठविणे.
३) श्री रवेन्द्र राऊत (वरिष्ठ लिपीक) यांना मुख्य लिपीक पदी बढती देणे.
४) महाविद्यालयास आवश्यक असणारे फार्निचर (डेस्क बेंच) खरेदी करणे.
५) Tally हा विषय वाणिज्य व अल्पकालावधी अभ्यासक्रम करिता कॉम्पुटरची संख्या वाढविणे.
६) नवीन सत्र २०२२-२०२३ मधील प्रवेश प्रक्रिया संबंधी चर्चा करणे
७) सत्र २०२२-२३ चा बजेट सादर करणे.
८) विद्यार्थ्यांच्या गणवेश विषय चर्चा करणे
९) मा. अध्यक्ष यांच्या वतीने वेळेवर येणारे विषय

Officiating Principal
Dr. L. D. Balkhande
College of Arts and Commerce
Pauni, Dist. Bhandara

महा. विकास समीती सदस्यांची नांवे व सह्या

| नावे | सही |
|---|---|
| १) डॉ. दीपा एम. बलखंडे | |
| २) श्री. मा. मिलींद एल. बलखंडे | (Signature) Balkhande |
| ३) श्री. एम. जी. वाहणे | (Signature) |
| ४) डॉ. स्वाती एस. शंभरकर | (Signature) |
| ५) श्री. एन. पी. सिंगाडे | (Signature) |
| ६) श्री. एन. जी. जाधव | (Signature) |
| ७) श्री. आर. जी. राऊत | (Signature) |
| ८) श्री. ॲडो. देव एन. गोवर्धन | |
| ९) श्री. डॉ विक्रम के. राखडे | |
| १०) श्री. डॉ. एम. एम. बांसू | |
| ११) श्री. श्रीकांत एस. भोगे | |
| १२) कु. सेजल विलास भारती | S. V. Bharti |
| १३) कु. लक्ष्मी ऋषी मेश्राम | L. R. meshram. |

Officiating Principal
Dr. L. D. Balkhande
College of Arts and Commerce
Pauni, Dist Bhandara

Page :
Date :

महाविद्यालय विकास समितीच्या २०२१-२०२२ सत्रातील द्वितीय सभेचे इतिवृत्त (दि. ०२/०५/२०२२)

सु.क्र. सीडीसी/८ दि. २९/०४/२०२२ नुसार आज दि. ०२/०५/२०२२ ला सकाळी ११.०० वाजता सी.डी.सी. समितीची २०२१-२०२२ सत्रातील द्वितीय सभा संस्था अध्यक्षा मा. दीपा एम. बलखंडे मॅडम यांच्या अध्यक्षते-खाली तसेच मा. सचिव मिलींद एल. बलखंडे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत व महाविद्यालयाचे मा. कार्यकारी प्राचार्य सह, प्राचार्य कक्षामध्ये सभा घेण्यात आली.

सभेला उपस्थित पदाधिकारी (नावे व सह्या)

१) श्री. मिलींद एल. बलखंडे — Balkhande
२) कार्यकारी प्राचार्य, एस. एम. नंदागवळी
३) उप प्राचार्य श्री. एन. पी. सिंगाडे
४) श्री. एम. जी. वाहणे
५) डॉ. प्रा. एस. एस. रामेश्वर
६) श्री. एन. जी. जाधव
७) श्री. आर. जी. राऊत — Raut
८) श्री. डॉ. एम. एम. बांकू
९) श्री. श्रीकांत एस. भोगे
१०) कु. सेजल विकास भारती - S.V.Bharati
११) कु. लक्ष्मी रूपी मेश्राम — L.R.meshram

Balkhande

सभाध्यक्षा
महाविद्यालय विकास समिती

---- पेज. नं. ५१ पहे ----

- पेज क्र. ५० परुन पुढे -

विषय क्र. १ - मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे:-

ठराव क्र. १ - २६ ऑगस्ट २०२१ चे अंकेक्षण Audit अंतर्गत झालेल्या खर्चाला मंजूरी प्रदान करण्यात आली. ठराव क्र. ३ नूसार सत्र २०२१-२०२२ करीता अर्थसंकल्प Budget नूसार खर्चासंबंधी मंजूरी देण्यात आली. ठराव क्र ४ नूसार अल्पकालावधी अभ्यासक्रमांना (Short Term Courses) सत्र २०२१-२२ मध्ये विद्यापीठाकडे मान्यतेला पाठविण्यात येवून विद्यापीठाद्वारे मंजूरी मिळाल्यानंतर अल्पकालावधी अभ्यासक्रम महाविद्यालयामध्ये सुरु करण्यात आले. ठराव क्र ५ नूसार प्रा. शीला कापसे यांच्या प्राचार्य पदाच्या कालावधीतील सत्र १९८८-८९ पासून देणी बाकी येत असलेल्या अंकेक्षणामधील मुद्दा २०२१-२२ च्या अंकेक्षणातून रद्द करण्यात आला. ठराव क्र ६ नूसार विद्यार्थ्यांच्या उपयोगाच्या दृष्टीकोनामधून दर महिन्याला साप्ताहीक आणी मासीक पाच प्रतीत खरेदी करण्यात येत आहेत. या विषयाला मान्यता देण्यात येवून ठराव क्र १ सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

विषय क्र. २ - श्री. संजय तुकाराम दुमाणे (शिपाई) यांच्या कालबद्ध पदोन्नतीचा प्रस्ताव पाठवणे:-

ठराव क्र. २ संजय तुकाराम दुमाणे यांच्या शिपाई पदावरील कार्यकालाला १० वर्ष पूर्ण झालेली आहेत, त्या अन्वये शासनाच्या नियमाअंतर्गत ७ व्या वेतन आयोगाच्या जी आर नूसार कालबद्ध पदोन्नती अंतर्गत १०, २०, ३० या कालावधी टर्मनूसार ते पाहिल्या कालबद्ध पदोन्नतीला

----- पेज नं. ५२ पुढे -----

Page :
Date : / /

- पेज क्र. ५१ वरुन पुढे -

पात्र होत आहेत. त्यामुळे त्यांना कालबाह्य मिळण्याच्या संबंधाने त्यांचा प्रस्ताव अंतिम मंजुरीकरीता मा. सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात यावा असे ठराव क्र २ ला सर्वानुमते मंजूरी देण्यात येवून ठराव पारीत करण्यात आला.

विषय क्र. ३ - श्री. रविन्द्र गजानन राऊत (वरिष्ठ लिपीक) यांना मुख्य लिपीक पदी बढती देणे :-

ठराव क्र- ३ श्री. रविन्द्र गजानन राऊत यांचे वरिष्ठ लिपीक पदावरील कार्यकाळाला ३ वर्ष पूर्ण झालेले आहेत. त्या अन्वये महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १८/०६/२०१६ परीपत्रका-नूसार तसेच सेवाजेष्ठता यादीनूसार त्यांना मुख्य लिपीक या पदाकरीता पदोन्नती देण्यात यावी असे सर्वानुमते सहमती देण्यात येवून ठराव क्र. ३ ला मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ४ - महाविद्यालयास आवश्यक असणारे फर्निचर (डेक्सबेंच) खरेदी करणे :-

ठराव क्र. ४ - महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या बैठकीच्या दृष्टीकोनामधून डेक्स बेंच खरेदी करणे गरजेचे आहे. आणीच्यातू सत्रापासून (२०२२-२०२३) आपल्या महाविद्या-लयामध्ये एम. ए. व एम. कॉम सुरु होणार आहे. त्यामूळे फर्निचर (डेक्स बेंच) खरेदी करणे आवश्यक आहे. यावर विस्तृत चर्चा होवून कमीत कमी १०००००/- (एक लाख रु.) तरतूद करणे आवश्यक आहे, यावर मिलींद श्री. बालपांडे साहेबांनी सूचवीले की सध्या आपल्याकडे निधी उपलब्ध

----- पेज नं. ५३ पुढे -----

Page :
Date : / /

--- पेज क्र. ५२ वरून पुढे ---

आल्यावर खरेदी करणार यावर सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली ठराव क्र. ४ ला सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ५ - Tally हा विषय वाणिज्य व अल्पकालावधी अभ्यासक्रम करीता कॉम्पुटरची संख्या वाढविणे :-

ठराव क्र. ५ - सभेपुढे विषय आल्यावर सर्वानुमते सध्याच्या स्थितीमध्ये महाविद्यालयामध्ये एकूण ७ कॉम्पुटर पीसी चालू आहेत. बाकी सर्व कॉम्पुटर पीसी नादुरुस्त आहेत Tally कोर्सच्या हिसोबाने एकूण २५ पीसी नियमीत चालू असले पाहिजे या अंतर्गत निधी उपलब्ध झाल्यानंतर लवकरात लवकर यासी पूर्तता करण्यात येईल. असे सर्वानुमते सहमती दर्शविण्यात येवून ठराव क्र ५ ला मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ६ - नविन सत्र २०२२-२०२३ मधील प्रवेश प्रक्रिया संबंधी चर्चा करणे :-

ठराव क्र. ६ - सत्र २०२२-२०२३ प्रवेश प्रक्रिये संबंधाने एम. ए. आणि एम. कॉम. संबंधी प्रवेश पत्र (माहिती पुस्तिका) स्वतंत्र छापण्यात यावेत. बी. ए. प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या विषयासंबंधी ऐच्छिक विषयाला पर्याय म्हणून 'मानशास्त्र' विषया ऐवजी 'संगीत', 'समाजशास्त्र' ऐवजी 'इतिहास' विद्यार्थ्यांना देण्यात यावा. Prospectus ची किंमत ३० रुपये ठेवण्यात यावे असे सर्वानुमते सहमती दर्शविण्यात येवून ठराव क्र. ६ ला मंजूरी देण्यात आली.

--- पेज नं. ५४ पुढे ----

Page :
Date : / /

-- पेज क्र. ५३ वरून पुढे --

विषय क्र. ७ - सत्र २०२२ - २०२३ चा बजेट सादर करणे :-

ठराव क्र. ७ - सत्र २०२२ - २३ ला लागणाऱ्या अनुमानित बाजारवर सविस्तर चर्चा होवून सर्वानुमते ठराव क्र ७ ला सहमती दर्शविण्यात येवून ठरावाला मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ८ - विद्यार्थ्यांच्या गणवेशा विषयी चर्चा करणे :-

ठराव क्र. ८ - प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गणवेशाबाबत चर्चा होवून सर्वानुमते असे ठरविण्यात आले की, बी.ए. आणि बी. कॉम. प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थीनी करीता नेव्ही ब्लू पॅन्ट आणि स्काय ब्लू सर्ट असावा तर या पूर्वीच्या वर्षाला जे द्वितीय व तृतीय वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वीचा असलेला गणवेश त्यांनी वापरण्यासंबंधी सर्वानुमते ठरावाला मंजूरी देण्यात येवून ठराव क्र ८ ला मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ९ - मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय :-

ठराव क्र. ९ - (अ) शंभरकर मॅडम यांच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांकरीता जे आपण आयकार्ड बनावितो ते चांगल्या क्वॉलीटीचे असायला हवे आणि माहिती कार्डवर विषयनोंदणीकृत असायला हवे यावर सर्वांनी सहमती दर्शविली, सर्वानुमते विषयाला मंजूरी देण्यात आली.

(ब) मा. मिलींद एल. वालखंडे साहेबांच्या मते प्रत्येक वर्गामध्ये गुड डिसीप्लीन कमेटी अंतर्गत गुड व्यक्तीची नियुक्ती करण्यात यावी आणि महाविद्यालयाच्या डिसीप्लीन कमेटीमध्ये प्रा. सिंगाडे, प्रा. जांभळे व श्री. साकत या

--- पेज नं. ५५ पुढे ----

Page :
Date : / /

--- पेज क्र. ५४ वरून पुढे ---

या सदस्यांची नियुक्ती करण्यात यावी या सुचनेला सर्वांनी सहमती दर्शविण्यात येवून या विषयाला सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

(क) महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी ड्रेस परीधान संबंधाने सर्वांनी पूर्णतः फॉरमल ड्रेस वापरून महाविद्यालयात यावे जिन्स पॅन्ट वापरून येवू नयेत, अथवा स्वईच्छेने त्यांना १००० रुपये महाविद्यालयात दंड जमा करावा लागेल. यावर सर्वांनी सहमती दर्शविली. या विषयाला मंजूरी देण्यात आली.

(ड) म. वि. स. सेक्रटरी यांनी स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीकोना मधून आपले विद्यार्थी ग्रामिण भागातीलच आहेत त्यांच्या हिताकरीता जनरल नॉलेज बुक खरेदी करून विद्यार्थ्यांना ग्रंथालयात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. "स्पर्धा परीक्षा अभ्यास विभाग" माजी विद्यार्थी संघातर्फे आयोजित करण्यात यावा व त्यावर जेलयुमणी अंतर्गत कार्यक्रम राबवून देख-रेख करण्यासंबंधी सर्वानुमते विषयाला मंजूरी देण्यात आली.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने म. वि. स. सचिव कार्यकारी प्राचार्य यांनी सर्वांचे आभार मानून सभा समाप्तीची घोषणा केली.

Officiating Principal
Dr. L. D. Balkhande
College of Arts and Commerce
Pauni, Dist. Bhandara

सचिव तथा प्राचार्य, महाविद्यालय विकास समिती